# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक ०७.०७.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०६.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १२ केसेसमध्ये १२ ईसमांवर कारवाई करून १०,१३०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०३ केसमध्ये १४ इसमावर कारवाई करुन ८,३५६/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,८४३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ३,५४,६००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) तहसील पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०७.०७.२०२६ चे ०४.३० वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे पथक पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, बंगाली पंजा, उमेश निनावेचे घरासमोर एका ॲक्टीवा गाडीवरील काळ्या रंगाचे शर्ट व पॅन्ट घातलेले ईसम अंमली पदार्थ विक्री करीत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून नमुद ठिकाणी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, एक ईसम अंधाराचा फायदा घेवून पळून गेला. तेथे असलेल्या दुसऱ्या ईसमास त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव शुभम विजय मेंढेकर वय ३० वर्ष रा. सतरंजीपूरा, सुनिल हॉटेल मागे, लकडगंज, नागपूर असे सांगितले. त्याची व ॲक्टीवा गाडी क्र. एम एच ४० सी. यु १३५ ची झडती घेतली असता, ॲक्टीवाचे डिक्कीमध्ये पिशवीमध्ये हिरवट रंगाचा अंमली पदार्थ गांजा एकुण ६९० ग्राम कि. २७,०००/— रु. चा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून गांजा, ॲक्टीवा गाडी असा एकुण ८७,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस विचारपूस केली असता, त्याने त्याचा पळून गेलेला साथीदार नामे गुड्डू रा. पाचपावली असल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(अ), एन.डी.पी. एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे तहसील येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती वनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्रीमती अनिता मोरे सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. संजय मेंढे, पोउपनि. अनिल ठाकुर, पोहवा. रामकैलास यादव, प्रदिप सोनटक्के, गवई, पोअं. पंकज निकम, राशिद शेख, पंकज बागडे व किशोर यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०२.०७.२०२६ चे २२.३० वा. ते दिनांक ०६.०७.२०२६ ००.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्यीत, प्लॉट क्र. ६२, गितांजली सोसायटी, मनिषनगर येथे राहणारे फिर्यादी रविराज प्रतापलाल कटरे वय ३४ वर्ष हे त्यांचे राहते घराला कुलूप लावून परिवारासह बिनाटोली, बालाघाट, मध्यप्रदेश येथे नातेवाईकाचे घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून, बेडरुममधील लाकडी आलमारीतील रोख ७०००/— रु व सोन्याचांदीचे वेगवेगळे दागिने असा एकूण १,९४,६००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. सलगर ९६७३९९१४०७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५,३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे यशोधरानगर :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०७.०७.२०२६ चे ०७.०५ वा. ते ०७.५६ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे यशोधरानगर येथील बिट मार्शल पोलीसांनी मिळालेल्या माहीतीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, राजीव गांधी पुलाकडून विटाभट्टी चौककडे जाणाऱ्या सार्वजनिक रोडवर एका टाटा एस चारचाकी गाडी क्र. एम.एच. ३१ सीक्यु ६७९० ची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये ०३ जिवंत गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निदर्यतेने चारा—पाणी न देता बांधुन ठेवल्याचे दिसुन आले. वाहन चालकास त्याचे नाव विचारले असता, त्याने आपले नाव जावेद नासिर खान वय ४० वर्षे रा. प्लॉट क्र. १५३६, सरवराबाद, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. वाहन चालकास गोवंशीय जनावरे बाबत कागदपत्रे मागीतली असता, कोणीतीही कागदपत्रे सादर केली नाही व वरील जनावरे हे त्याचा साथीदार पाहिजे आरोपी वकील अहमद कुरेशी अब्दुल बशीर कुरेशी वय ४२ वर्ष रा. नई वस्ती, टेका, पाचपावली, नागपूर याचे असल्याचे सांगितले. आरोपी हे गोवंशीय जनावरे यांना कत्तली करीता नेत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन ०३ गोवंशीय जनावरे व टाटा एस पिकअप वाहन असा एकुण किंमती अंदाजे ४,००,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद जनावरे यांना गौशाळा येथे दाखल करण्यात आले आहे.

यापकरणी फिर्यादी पोअं. क्षितेश चौरसिया यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपींविरूध्द कलम ५(अ)(२),९,९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(१)(ड) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६०, सहकलम ३(५) भा.न्या.सं., सहकलम ८३, १७७ मो.वा. का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे पारडी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०७.०७.२०२६ चे ०१.२५ वा. चे सुमारास, पारडी पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, धनगौरी नगर, पोवारी वस्ती, अन्नपुर्णा कॉलनीजवळ, एक निळया रंगाचा शर्ट घातलेला इसम हातात शस्त्र घेवून धूमाकूळ घालत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, तेथे एक इसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी धारदार चाकु काढुन घेतला. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राजकुमार बिरजु यादव वय २४ वर्षे, रा. शामनगर, शितलामाता मंदीरमागे, पारडी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती अंदाजे ३००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे पारडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे यशोधरानगर :–** दिनांक ०५.०७.२०२६ चे २०.०० वा. चे सुमारास, तीनचाकी अल्फा गाडी क्र. एमएच ४९ डी ६२१४ या गाडीमध्ये लाल मिरची भरुन गणपत आनंदराव चामटकर वय ५६ वर्ष रा. रामनगर, हनुमान मंदीरमागे, पाचपावली हे वृंदावन नगर कडून दहीबाजार झाडे चौक कडे जात असतांना, पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, जामदारवाडी टर्निंगवर चालकाने गाडी वळविली असता, गणपत चामटकर यांचा तोल जाऊन ते रोडवर खाली पडल्याने, गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो व तेथून मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ०६.०७.२०२६ चे २३.४० वा. सुमारास डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे मपाउपेनि. देशमुख यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**